# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** शाहुपुरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0171 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/06/2025 02:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Date From (दिनांक पासून):** 05/06/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/06/2025
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/06/2025 **Time (वेळ):** 00:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/06/2025 02:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पारंगे चौक, सातारा येथील,राजेंद्र टी हाऊस समोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजकुमार पंढरीनाथ ठेंगे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | काशीळ ताजि सातारा,शाहुपुरी,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | निशीगंधा कलनी, समर्थनगर ,कोडोली सातारा,शाहुपुरी,सातारा,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850899527

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजित दादासाहेब घाडगे | | | 1. धोंडेवाडी ता खटाव जि सातारा, शाहुपुरी,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दि.6/6/2025

मी श्री राजकुमार पंढरीनाथ ठेंगे वय -53 वर्षे, व्यवसाय लॉन्ड्री, रा. निशीगंधा कॉलनी, समर्थनगर कोडोली सातारा ता.जि. सातारा मुळ रा. काशीळ ता.जि. सातारा मो नं. 9850899527

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असून माझे मुळ गाव काशिळ ता.जि. सातारा आहे. माझा अजंठा चौक, सातारा येथे गेले 10 वर्षापासून लॉंड्रीचा व्यवसाय करीत आहे.

मी दिनांक 03/06/2025 रोजी सकाळी 10.00 वा. चे सुमारास अँटी करप्शन ब्यूरो सातारा येथे समक्ष हजर राहून पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे साहेब यांची भेट घेवून माझ्याकडे करण्यात येणा-या लाचेच्या मागणीबाबत तक्रार थोडक्यात सांगितली व माझे सांगणेप्रमाणे टाईप केलेला तक्रारी अर्ज वाघमारे साहेब यांचेकडे दिला. त्यानुसार मी माझ्याकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली. त्यानुसार दिनांक 03/06/2025 रोजी माझ्या तक्रारीवरून पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी दोन सरकारी पंचांना बोलावून घेतले. पंच अँटी करप्शन ब्यूरो कार्यालयात हजर झाले. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी माझी ओळख करून घेवून त्यांचे सह असणाऱ्या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा गोगावले, पोहवा ताटे यांची एकमेकांना ओळख करून दिली. पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना तक्रार सांगितली की, मी सुमारे दहावर्षापूर्वी गजानन कृष्णराव ढाणे यांचे अमरलक्ष्मी, पाटील कॉलनी येथील घरात भाड्याने राहत असल्यामुळे माझी त्यांची ओळख आहे. गजानन ढाणे यांनी खिंडवाडी ता.जि.सातारा येथील विठ्ठल महादेव जाधव यांचा गट नंबर 17/1/1 यातील 60 गुंठे शेतजमीन दि. 21/4/2004 रोजी विकत घेतली असून त्या शेतजमीनीची नोंद सातबारा वरती झाली नसल्याचे त्यांनी मला सांगितले होते. ते परगावी असल्यामुळे सदर मिळकतीबाबतची कामे त्यांना करता येत नसल्याचे सांगून त्यांनी मला दि.05/01/2020 रोजी खिंडवाडी ता.जि.सातारा येथील गट नंबर 17/1/1शेतजमीनीचे पुढील कायदेशीर बाबींची पुर्तता करणेसाठी कुलमुखत्यारपत्र लिहून दिले.

त्याप्रमाणे मी तलाठी व मंडलाधिकारी कार्यालय कोडोली येथे समक्ष जावून खिंडवाडी ता. जि. सातारा येथील गट नंबर 17/1/1 शेतजमीन नोंदीचे काम करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला. जमीनीचे मुळ मालक विठ्ठल महादेव जाधव यांनी गट नंबर 17/1/1 मधील 13 गुंठे क्षेत्र हे यापूर्वीच विकलेले आहे. त्यानंतर दि.05/08/2024 रोजी मला समजले की, जमीनीचे मुळ मालक विठ्ठल महादेव जाधव यांनी पुन्हा गट नंबर 17/1/1 मधील उर्वरित 47 गुंठ्यापैकी 10 गुंठे शेतजमीन खरेदी दस्त 3894/2024 दि. 12/07/2024 अन्वये शिवाजी बाजीराव मदने व नासीर इस्माईल मुजावर यांना विकली असून त्याची नोंद तलाठी खिंडवाडी यांनी धरली असल्याचे मला समजले. त्यामुळे मी मंडलाधिकारी कोडोली ता.जि. सातारा हे पद सध्या रिक्त असल्यामुळे व सदर पदाचा चार्ज मंडलाधिकारी खेड अजित घाडगे यांचेकडे असल्याने मी त्यांचेकडे तक्रार रजिष्टर नंबर 16/2024 अन्वये आक्षेप नोंदवला. त्याबत मंडलाधिकारी, कोडोली घाडगे यांनी सदर आक्षेपावर सुनावणीअंती दि.17/02/2025 रोजी माझा आक्षेप मान्य असलेबाबतचा निर्णय दिला व सदर 10 गुंठे शेतजमीच्या नोंदणीस स्थगिती दिली.

त्यानंतर दिनांक 22/05/2025 रोजी सातारा बस स्टॅण्ड समोरील सर्कल कार्यालयासमोर मंडलाधिकारी अजित घाडगे यांची भेट झाली असता त्यांनी मला मी तुमच्या आक्षेपांवरून सदरचा फेरफार रद्द केला आहे. त्या कामाचे व सातबारा सदरी वरील उर्वरित 47 गुंठेची नोंद तुमच्या बाजूने घेतो असे दोन्ही कामाचे मिळून मला एक लाख रुपये दया असे म्हणाले त्यानंतर तुम्ही आता तुमचा खरेदी दस्त, चालू सातबारा इ. कागदपत्रे व नोंद धरणेबाबतचा अर्ज तलाठी कार्यालय, खिंडवाडी यांचे कार्यालयामध्ये जमा करा. सदर 47 गुंठ्याची नोंद करायची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त मला पैसे पोहोच करा, तलाठी कार्यालयातील नोंद व सदर नोंदीवरून फेरफार उतारा चौकशी करून सातबारा सदरी तुमचे नाव लावण्याची जबाबदारी माझी असे म्हणत मंडलाधिकारी घाडगे यांनी माझ्याकडे एक लाख

रुपयाची मागणी केली. मंडलाधिकारी घाडगे यांनी माझे आक्षेपाचा विचार करून पूर्वी झालेला 10 गुंठे खरेदीचा फेरफार रद्द करून निर्णय माझ्याबाजूने दिला असल्याने ते माझे सदरील 47 गुंठे नोंदीचे काम तलाठी कार्यालयात सांगून व नोंद कायम करून सातबारा उतारावरती आमचे नावाची नोंद करतील अशी खात्री वाटल्याने मी त्यास होकार दिला. सदर दस्ताची नोंद घेण्याची सुरवात तलाठी यांचेकडे अर्ज व दस्ताची छायांकित प्रत देवून होते ते मला माहीत असल्यामुळे तसेच मंडलाधिकारी, घाडगे यांनी तलाठी खिंडवाडी यांचेकडे दस्त नोंदणीसाठी अर्ज देण्यास सांगितल्याने मी दि.26/05/2025 रोजी तलाठी कार्यालय, खिंडवाडी येथे जावून तलाठी बर्गे यांचेकडे खरेदीपत्राची नोंद करून मिळणेबाबतचा अर्ज दिला.

मी आज दि.03/06/2025 रोजी तलाठी कार्यालय, खिंडवाडी येथे जावून तलाठी बर्गे तसेच मंडलाधिकारी, घाडगे यांची भेट घेवून माझ्या कामाच्या अनुषंगाने चर्चा करून मागणी होणाऱ्या लाच रक्कमेबाबत चर्चा करणार आहे. मंडलाधिकारी, घाडगे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्याची मला अजिबात इच्छा नाही तरी त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी. त्यानंतर टाईप केलेली माझी तक्रार पोउअपधीक्षक वाघमारे साहेव यांना दिली असता त्यांनी व पंचांनी ती वाचून बघितीली व त्यावर सह्या केल्या. पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी माझ्या कामाची सुरुवात ही तलाठी वर्गे यांचेकडून होणार असल्याने प्रथम तलाठी बर्गे यांचेकडे पडताळणी कामी पाठविण्याचा पंचासमक्ष निर्णय घेतला.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 15.19वाचे सुमारास मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर यांचेसोबत माझेकडील मोटार सायकल क्रमांक एमएच -14- बीई 6972 वरून अँटी करप्शन ब्यूरो सातारा कार्यालय येथून खिंडवाडी ता.जि. सातारा येथे तलाठी कार्यालयामध्ये तलाठी बर्गे यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी त्यांचे ए.सी.बी. कार्यालयात थांबून राहिले.

मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर असे खिंडवाडी ता. जि. सातारा येथील तलाठी येथे गेलो असता तलाठी बर्गे हे कार्यालयात हजर नसल्यामुळे मी माझे मोबाईल क्रमांक 9850899527 वरून स्पीकर ऑन करून तलाठी बर्गे यांचा मोबाईल क्रमांक 9730628532 वर 15.28 वाचे दरम्यान संपर्क करून खिंडवाडी तलाठी कार्यालयात आलो असल्याचे सांगितले तेव्हा त्यांनी मी सकाळी आलो होतो, आता सर्कल ऑफिस, एसटी स्टँण्ड समोर असल्याचे सांगितले. त्यामुळे मी व पंच नं. 1 असे माझे मोटार सायकलवरून सर्कल ऑफिस, सातारा एसटी स्टँण्ड समोर आलो. तेव्हा माझी तलाठी बर्गे यांची भेट झाली. तेव्हा मी त्यांचेशी माझ्या नोंदीच्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा मी तलाठी बर्गे यांना खरेदी पत्रात आहेत, तेवढं सातबारा नाहीत असे म्हणालो असता तलाठी बर्गे यांनी, त्यामुळे आपल्याला त्याची नोंद घेता येणार नाही असे मला सांगितले. तेव्हा मी त्यांना तुम्ही घाडगे सरांशी बोलाल हा विषय, दाखवून काम आपण दोघ संघच चर्चा करायची, तुम्हाला कस योग्य वाटतय सांगा असे म्हणालो असता तलाठी बर्गे हे, तुम्ही बोला की असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेशी कामाबाबत चर्चा करून मी व पंच नं 1 यांचे सह ए. सी.बी. कार्यालय सातारा येथे 16.14 वाचे सुमारास परत आलो.

तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरून पोहवा गोगावले यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व पंचांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली. त्यामध्ये तलाठी बर्गे यांनी नोंदीचे काम होणार नसल्याचे सांगून लाचेची मागणी न केल्याने कारवाई स्थगित करून व मंडलाधिकारी घाडगे यांचेकडे पुढील पडताळणी कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मंडलाधिकारी श्री घाडगे यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरवून मला व पंचांना पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगून आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 17.20 वा चे सुमारास मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर यांचेसोबत माझेकडील मोटार सायकलवरून एसीबी कार्यालय येवून येथुन सर्कल ऑफिस, एसटी स्टँण्ड, समोर सातारा येथे त्यांची भेट घेण्याकरिता रवाना केले त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी ए.सी.बी. कार्यालयात थांबून राहिले. मी व पंच नं. 1 बोळाईकर असे माझे मोटार सायकलवरून एसटी स्टँण्डचे समोर सर्कल कार्यालयाचे बाहेर मोटार सायकल थांबवून कार्यालयात गेलो असता तेथे मंडलाधिकारी घाडगे हे हजर नसल्याने त्यांना माझे मोबाईल क्रमांक 9850899527 वरून स्पीकर चालू करून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईल क्रमांक 7887711062 वर संपर्क केला असता त्यांनी एसटी स्टँडचे पाठीमागे स्टेट बँकेजवळ येण्यास सांगितले. तेव्हा मी पंचासोबत जावून त्यांची भेट घेतली

असता त्यांचेशी माझ्या नोंदीच्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा ते मला तुम्ही तो पेमेंटचा विषय केला की नाय पुढे हे होईलना पेमेंटचा विषय केला की नाय पुढे पण आपल किती दिवस झाल मांडलय असे म्हणाले असता मी त्यांना नाय मी तुम्हाला सांगितल की नाय म्हणतो तिकडून सिग्नल येत नाय तोपर्यंत मी तरी काय करणार माझा रोल सांगतो तुम्हांला माझा काय माझ्याकडून काय काम आहे असे म्हणालो तेव्हा मंडलाधिकारी घाडगे हे मला, पेमेंट न करता कस होणार, अस नाय का? असे म्हणाले. त्यानंतर चर्चेत मंडलाधिकारी घाडगे मला, असा विषय आहे, त्यो आम्हांला अस म्हणत्त नाय, कायदयात अजून तरतूद नाय, एकाद्याचा निकाल चुकीचा दिला तर म्हणून त्याला शिक्षा करावी, म्हणून असा विषय आहे. कसं असतय उद्याला बघतो मी नोंदीच असे म्हणालेने मी पंचासोबत एसीबी कार्यालयात 19.11 वा चे सुमारास परत आलो. मंडलाधिकारी घाडगे यांनी दिनांक 04/06/2025 रोजी नोंदीचे काम करणार असल्याचे सांगितलेने पडताळणी कारवाई स्थागित करण्यात आली.

त्यानंतर पोउअपधीक्षक वाघमारे यांनी दिले सुचनेप्रमाणे मी दिनांक 04/06/2025 रोजी सकाळी 10.00वाजता एसीबी कार्यालयात हजर झालो. पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 12.14 वा चे सुमारास मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर यांचेसोबत माझेकडील मोटार सायकल वरून एसीबी कार्यालय सातारा येथून सर्कल ऑफिस सातारा येथे रवाना झालो. सर्कल ऑफिस, सातारा येथे गेल्यानंतर मी माझ्या मोबाईल फोनवरून त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता, त्यांनी ते काय झालं, जरा थोडसं बाहेर आलोय मी, करतो मी फोन असे मला म्हणाल्याने मी पंचासह पुन्हा एसीबी कार्यालयात 12.36 वाचे सुमारास परत आलो. मंडलाधिकारी घाडगे यांची भेट न झाल्याने व त्यांनी फोन करणार असल्याचे सांगितल्याने आम्ही एसीबी कार्यालयामध्ये थांबून राहिलो. त्यानंतर मंडलाधिकारी घाडगे यांचा फोन न आल्याने पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी पंचांच्या सहमतीने मंडलाधिकारी घाडगे यांना संपर्क करण्याचे ठरवून व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून 17.52 वाचे सुमारास मी माझे मोबाईल वरून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईलवर स्पीकर चालू करून संपर्क केला असता, त्यांनी तासभर लागतोय मला, हाय का तुम्ही का जाणार आहे, असे विचारले असता मी त्यांना आले की फोन करा, कुठंशी यायचे ते सांगा असे म्हणालो. त्यानंतर आम्ही एसीबी कार्यालयामध्ये थांबून राहिलो.

त्यानंतर 19.17 वाचे सुमारास मंडलाधिकारी घाडगे यांचा मला फोन आला असता लागलीच पोउअपधीक्षक वाघमारे साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला. तेव्हा मंडलाधिकारी, घाडगे यांनी मला सर्किट हाऊस सातारा जवळ येणेबाबत निरोप दिला. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टच्या आतील बनियानमध्ये लावून एसीबी कार्यालय येथून 19.20वाचे सुमारास सर्किट हाऊस, सातारा येथे जाणेसाठी पंचासोबत रवाना केले. मी व पंच नं 1 बोळाईकर असे माझे मोटार सायकलवरून जात असताना मंडलाधिकारी घाडगे यांचा फोन आला व त्यांनी मला झेडपी चौक येथील राजपुरोहित दुकानचे शेजारील हरमन चहा येथे येण्यास सांगितले. तेव्हा मी पंचासोबत तेथे गेलो व मंडलाधिकारी घाडगे यांना फोन केला असता, ते माझ्या जवळ आले हरमन चहा दुकानचे समोरील फुटपाथवर मी व मंडलाधिकारी घाडगे यांनी माझ्या कामासंबंधी चर्चा केली. तेव्हा मी त्यांना मी माझे नोंदीचे काम घ्या की करून मग म्हटले, काय सत्तेचाळीस तर सत्तेचाळीस गुंठे, बाकीच तेरा गुंठे ते, तीन गुंठे आणि ते दहा गुंठे, अस तेरा गुंठे म्हणले. फेरफार वगैरे काढून त्याच्यावर अपील करून किंवा वकिल देवुन पुढे लढ्या पण हे तरी कमीत कमी झाल पाहीजे" असे म्हणालो असता मंडलाधिकारी घाडगे" करुया की" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "त्याच म्हणण कस हाय कि परफेक्ट किती द्यायचे किती कमी करत्याती ते विचारा म्हटले आता त्यांच्याकडं. पण अव्हेलेबल नाहीती पण काल कायतरी पाहुण्यासनी वगैरे फोन करून एँडजेस्टमेंट केलीया मग दुपारी तुम्हाला म्हटलं फोन केला दुपारी त्यासाठीच तुम्हाला बोलु अगर नको असे म्हणाले." तेव्हा मंडलाधिकारी घाडगे" तुम्हाला सांगु का पेमेन्ट आधी द्याव लागेल पेमेन्ट दिल्याशिवाय हात लावणार नाय ती पेमेन्ट आणलय का? पेमेन्ट पहिल घेवुन या" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "बरं बरं. बरं. ढाणेंच म्हणणं किती द्यायच, आणि किती कमी करत्याती ते विचरा" असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी घाडगे यांनी चर्चा करून "काय करा, आता तुम्ही काम करा, त्यांच्याकडून एवढे घेतले, तुम्ही काय करा पंच्चाहत्तर करा" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "बर.बर." असे म्हणालो तेव्हा मंडलाधिकारी घाडगे' तुम्हाला सात बारा मिळाला की राहीलेले पंचवीस द्या" असे म्हणाले त्यावर मी "ठिक हाय चालतय" असे म्हणालो. तेव्हा मंडलाधिकारी घाडगे हे "तुम्हाला बी वाटणार की बाबा बदली झाली किंवा काय" असे म्हणाले त्यानंतर मी व मंडलाधिकारी घाडगे यांचेत कामाबाबत चर्चा केली. तेव्हा मंडलाधिकारी घाडगें धरली ना एकदा की परत विषय मिटला, तो कार्यकर्ता कसा हाय दिल्याशिवाय धरणार नाय तुम्हाला सांगतो. "असे म्हणाले. त्यावर मी "बर्गे आण्णा व्हयं" असे म्हणाले. त्यावर मंडलाधिकारी घाडगे "हम्म शंभर टक्के धरणार नाय.."

असे म्हणाले. त्यावेळी माझेत व मंडलाधिकारी घाडगेयांचेत तक्रारदार यांची तक्रार केलेली नोंद करणेच्या कामाबाबत चर्चा केली. त्यावेळी त्यांनी मला, उद्या किती वाजता भेटणार सांगा मला असे विचारले असता मी काय नाय, मी आता फोन करतो त्यांना, येतो म्हणले गाडी करुन सकाळी तुम्हाला फोन करुन सांगेन असे म्हणालो असता मंडलाधिकारी घाडगे यांनी, अकरा च्या आत या असे सांगितले. त्यानंतर मी पंच नं 1 यांचे सोबत एसीबी कार्यालय सातारा येथे 19.42 वाचे सुमारास परत आलो व पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांना घडलेली हकीकत सांगितली. व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून मंडलाधिकारी घाडगे यांनी माझे नोंदीचे काम करण्यासाठी माझ्याकडे एक लाख रुपये लाचेची मागणी करून उद्या दिनांक 05/06/2025 रोजी सकाळी 11.00 वाजणेच्या पुर्वी 75,000/- रकम घेवून बोलाविले असल्याचे व 25,000/- रु नोंद झाल्यानंतर देण्यास सांगितल्याची खात्री झालेने दिनांक 05/06/2025 सापळा कारवाई करण्याचे पंचांचे सहमतीने ठरवून मला घरी जाण्यास सांगितले,

आज दिनांक 05/06/2025 रोजी 08.30 वा चे सुमारास मी पंचासह एसीबी कार्यालयामध्ये हजर असताना पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना सापळा पूर्व व सापळा कारवाईची माहिती थोडक्यात सांगून प्रक्रिया समजावून सांगितली, तसेच सापळा पथकातील पोहवा ताटे, पोहवा गोगावले, पोहवा राजपूरे यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 75,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणून पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी दिले सुचनेवरून सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचांना समजावून सांगितले. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व त्यांच्या सहकायांनी पंचासमक्ष सापळापूर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सूचनेवरून पोहवा ताटे यांनी अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ही माझे पँन्टच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात ठेवून दिली व मंडलाधिकारी घाडगे यांना लाच रक्कम दिल्या नंतर डोक्यावरील टोपी काढण्याचा इशारा करण्याच्या सूचना पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला दिल्या.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून मंडलाधिकारी घाडगे यांची कोणत्या ठिकाणी भेट घेण्यासाठी जायचे आहे याची माहिती घेणेसाठी माझ्या मोबाईल फोनवरून फोन करण्यास सांगितला व सदरचा फोन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करणार असल्याचे सांगून व्हॉईस रेकॉर्डर चालू केल्यानंतर माझे मोबाईल फोनवरून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईलवर स्पीकर चालू करून 09.56वाचे सुमारास संपर्क केला असता त्यांनी पोवई नाका, सातारा येथे येण्यास सांगितले. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बनियानमध्ये लावून मला पंच नं 1 यांचे सोबत माझे मोटार सायकलवरून पोवई नाका येथे 10.21 वाचे सुमारास रवाना केले. आमचे पाठोपाठ पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेव व सापळा पथक व पंच नंबर 2 हे त्यांचे शासकीय वाहनातून आले. मी पोवई नाका सातारा येथे आल्यानंतर माझे मोबाईलवरून स्पीकर चालू करून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईल वरती 10.22 वा चे सुमारास संपर्क केला असता त्यांनी मला स्टेट बँकेजवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नं 1 असे एसटी स्टँडचे पाठीमागील स्टेट बँक जवळ येवून थांबलो. आमचे पाठोपाठ पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व सापळा पथक आमचे पाठोपाठ येवून स्टेट बँक व पारंगे चौकामध्ये सापळा लावून थांबले. काही वेळानंतर मंडलाधिकारी घाडगे यांची वाट पाहून मी त्यांना पुन्हा कॉल केला असता ते स्टेट बँकेसमोर आले व मला कॉर्नरला चहा घेवू असे म्हणाले, तेव्हा मी पुढे व पंच मागे असे चालत कॉर्नरच्या चहाचे टपरीवर गेलो. तेथे मंडलाधिकारी घाडगे आले. त्यांचेशी मी माझ्या कामाबाबत चर्चा करून मंडलाधिकारी घाडगे यांना नोंद घालण महत्वाच आहे. पंच्याहत्तर हजार रुपये दिल ढाण्यांनी काल, सकाळी आणून, मी म्हणल मग मी काय मग बर्गे साहेबांच्याकड काय जात नाही. आपल्या स्तरावरच करून घ्या असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी घाडगे हे, नको जायला, त्यो नाहीच म्हणत होता, त्याला मी आता मी सिनीयर आहे. त्याला मी समजून सांगीतल मग म्हणला मी घेऊन येतो इथं, आज येणार आहे तो माझ्याकडे मी बोलावलाय. अशा पद्धतीन अशी नोंद घालायची तू चुकीची घालू नकोस तुला अस म्हणत नाय की दस्त साठ गुंठ्यांचा हाय न मग आपण त्याचा न उल्लेख करता डायरेक्ट सत्तेचाळीस गुंठ्याचा अस नाय. तो बी उल्लेख करायचा. माग पुढे समजा परत कोर्टात तुम्ही गेला असे म्हणाले. त्यावर मंडलाधिकारी घाडगे यांनी, आज रोजी ज्याच्या नावावर सत्तेचाळीस आहे म्हणून सत्तेचाळीस देतोय असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना, सत्तेचाळीस देताय वर बर असे म्हणालो असता मंडलाधिकारी हे, आस, त्याजा फेरफार व्यवस्थित घालून देतो, त्याजी काळजी करू नका असे म्हणाले. त्यावर मी त्यांना, ढाणे म्हणले फोन करा लगेच राहीलेले पंचवीस पण देऊन टाकू लागलीच, म्हणले कवातरी द्यायचच आहे असे म्हणालो त्यावर मंडलाधिकारी घाडगे हे नाय काय अडचण तुम्ही वेळ केला लय पण म्हंजी कशासाठी वेळ केला. मी असताना का नाय भल तुमी म्हणला असता का नाय साहेब

माझ्यावर विश्वास ठेवा तेवढ मला करून द्या, पण आता बदल्या हायत्या, ते दुसऱ्याला बिनकामाच मला म्हंजी एक मदत घ्यायला लागती ना स्वतःच्या हातान आणि दुसऱ्याला हे करण म्हंजी तुम्ही नुसत मला म्हणला असता का नाय माझा शब्द हाय असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांचेशी कामाबाबत चर्चा करून हे पंच्याहत्तर हजार हायती मोजून घेताय? असे म्हणालो. तेव्हा मंडलाधिकारी घाडगे हे मी कधीच मोजून घेत नाय, कुणाचेच घेत नाय, मला कमीच कधी येत नाय, या गाडीत या असे म्हणाले. त्यावेळी मी च मंडलाधिकारी घाडगे हे त्यांच्या गाडीमध्ये बसलो असता मी माझ्या कडील पँन्टच्या उजव्या खिशातील अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून मंडलाधिकारी घाडगे यांचे पूढे धरली असता त्यांनी तो लाख रक्कम त्यांच्या डाव्या हात्राने घेवून शर्टच्या वरील डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी गाडीबाहेर येवून माझ्या डोक्यावरील टोपी काढून सापळा पथकास दिसेल असा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा सापळा पथकातील पोहवा ताटे, पोहवागोगावले यांनी मंडलाधिकारी घाडगे यांना गाडीतून बाहेर घेवून अनुक्रमे उजवा हात व डावा हात पकडला. पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरून पोहवा राजपूरे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. ती वेळ 10.57 वा चे सुमाराची होती. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मंडलाधिकारी घाडगे यांना त्यांची ओळख सांगून त्यांना अँथ्रासिन पावडर लावलेल्या लाच रक्कमेसह ताब्यात घेतले, त्यावेळी पोलीस उपधीक्षक वाघमारे यांचे सुचनेवरून पंच नंबर 2 यांनी मंडलाधिकारी घाडगे यांचे शर्टच्या खिशातील लाच रक्कम काढून स्वतःचे ताब्यात घेतली. ती वेळ 11.00 वा. ची होती.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी त्यांचे शासकीय वाहनामध्ये बसवून सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. तसेच अँब्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व आमच्या हातांची अँल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई एसीबी कार्यालय, सातारा येथे जावून करण्याचे निश्चित केले.

तरी मी खिंडवाडी ता.जि. सातारा येथील गट नंबर 17/1/1 या शेत जमीनीच्या झालेल्या दस्तांमधील लिहून घेणारे यांचे वतीने कुलमुखत्यावर असून सदरचा दस्त हा 60 गुंठे असून मुळ मालक यांनी दस्तामधील लिहून घेणार यांची नावे सातबारा सदरी न लागल्याचा फायदा घेवून पूर्वीच विक्री केलेल्या 60 गुंठयापैकी 13 गुंठे जमीन ही पुन्हा विक्री केली आहे. तदनंतर 2024 मध्ये मुळ मालक यांनी पुन्हा उर्वरित 47 गुंठ्यापैकि 10 गुंठे जमीन ही विक्री केली होती. सदर दस्तावरून तलाठी खिंडवाडी यांनी सदर 10 गुंठे जमीनीची नोंद सातबारा सदरी धरली. त्यामुळे मी कुलमुख्यत्पार या नात्याने मंडलाधिकारी कोडोली यांचेकडे सदर नोंदीवर आक्षेप नोंदविला. त्यावर मंडलाधिकारी घाडगे यांनी आक्षेपावरील सुनावणीअंती माझा आक्षेप मान्य केल्याचा निर्णय देवून सदरील 10 गुंठे जमीनीच्या नोंदीबाबतचे फेरफारास स्थगिती दिली. दिनांक 04/06/2025 रोजीच्या पडताळणी कारवाई वेळी मंडलाधिकारी घाडगे यांनी फेरफार रद्द केल्याच्या कामाचे व तलाठी बर्गे यांचेकडून उर्वरित 47 गुंठे नोंदीचे काम करून देतो म्हणून माझ्याकडे एकूण एक लाख रुपये लाचेची मागणी करून दिनांक 05/06/2025 रोजी सापळा कारवाई वेळी अजित दादासाहेब घाडगे वय-48 वर्ष, मंडलाधिकारी खंड अतिरिक्त कार्यभार कोडोली, महसुल खाते, वर्ग-3 यांनी माझ्याकडून 75,000/- रु लाच रक्कम पारंगे चौक, सातारा येथील राजेंद्र टी हाऊस समोर स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

हा खबरी जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sachin Ganpatrao Mhetre(I (Inspector)) / 15101000402SGMM8101H **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** पो.स्टे.ऑफिसर
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी) शाहुपुरी पोलीस स्टेशन सातारा

**Name (नाव):** Sachin Ganpatrao M
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402SGMM81(

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

खबरी जबाब दि.6/6/2025

मी श्री राजकुमार पंढरीनाथ ठेंगे वय -53 वर्षे, व्यवसाय लॉन्ड्री, रा. निशीगंधा कॉलनी, समर्थनगर कोडोली सातारा ता.जि. सातारा मुळ रा. काशीळ ता.जि. सातारा मो नं. 9850899527

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असून माझे मुळ गाव काशिळ ता.जि. सातारा आहे. माझा अजंठा चौक, सातारा येथे गेले 10 वर्षापासून लॉंड्रीचा व्यवसाय करीत आहे.

मी दिनांक 03/06/2025 रोजी सकाळी 10.00 वा. चे सुमारास अँटी करप्शन ब्यूरो सातारा येथे समक्ष हजर राहून पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे साहेब यांची भेट घेवून माझ्याकडे करण्यात येणा-या लाचेच्या मागणीबाबत तक्रार थोडक्यात सांगितली व माझे सांगणेप्रमाणे टाईप केलेला तक्रारी अर्ज वाघमारे साहेब यांचेकडे दिला. त्यानुसार मी माझ्याकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली.

त्यानुसार दिनांक 03/06/2025 रोजी माझ्या तक्रारीवरून पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी दोन सरकारी पंचांना बोलावून घेतले. पंच अँटी करप्शन ब्यूरो कार्यालयात हजर झाले. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी माझी ओळख करून घेवून त्यांचे सह असणाऱ्या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा गोगावले, पोहवा ताटे यांची एकमेकांना ओळख करून दिली. पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना तक्रार सांगितली की, मी सुमारे दहावर्षापूर्वी गजानन कृष्णराव ढाणे यांचे अमरलक्ष्मी, पाटील कॉलनी येथील घरात भाड्याने राहत असल्यामुळे माझी त्यांची ओळख आहे. गजानन ढाणे यांनी खिंडवाडी ता.जि.सातारा येथील विठ्ठल महादेव जाधव यांचा गट नंबर 17/1/1 यातील 60 गुंठे शेतजमीन दि.21/4/2004 रोजी विकत घेतली असून त्या शेतजमीनीची नोंद सातबारा वरती झाली नसल्याचे त्यांनी मला सांगितले होते. ते परगावी असल्यामुळे सदर मिळकतीबाबतची कामे त्यांना करता येत नसल्याचे सांगून त्यांनी मला दि.05/01/2020 रोजी खिंडवाडी ता.जि.सातारा येथील गट नंबर 17/1/1शेतजमीनीचे पुढील कायदेशीर बाबींची पुर्तता करणेसाठी कुलमुखत्यारपत्र लिहून दिले.

त्याप्रमाणे मी तलाठी व मंडलाधिकारी कार्यालय कोडोली येथे समक्ष जावून खिंडवाडी ता. जि. सातारा येथील गट नंबर 17/1/1 शेतजमीन नोंदीचे काम करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला. जमीनीचे मुळ मालक विठ्ठल महादेव जाधव यांनी गट नंबर 17/1/1 मधील 13 गुंठे क्षेत्र हे यापूर्वीच विकलेले आहे. त्यानंतर दि.05/08/2024 रोजी मला समजले की, जमीनीचे मुळ मालक विठ्ठल महादेव जाधव यांनी पुन्हा गट नंबर 17/1/1 मधील उर्वरित 47 गुंठ्यापैकी 10 गुंठे शेतजमीन खरेदी दस्त 3894/2024 दि. 12/07/2024 अन्वये शिवाजी बाजीराव मदने व नासीर इस्माईल मुजावर यांना विकली असून त्याची नोंद तलाठी खिंडवाडी यांनी धरली असल्याचे मला समजले. त्यामुळे मी मंडलाधिकारी कोडोली ता.जि. सातारा हे पद सध्या रिक्त असल्यामुळे व सदर पदाचा चार्ज मंडलाधिकारी खेड अजित घाडगे यांचेकडे असल्याने मी त्यांचेकडे तक्रार रजिष्टर नंबर 16/2024 अन्वये आक्षेप नोंदवला. त्याबत मंडलाधिकारी, कोडोली घाडगे यांनी सदर आक्षेपावर सुनावणीअंती दि.17/02/2025 रोजी माझा आक्षेप मान्य असलेबाबतचा निर्णय दिला व सदर 10 गुंठे शेतजमीच्या नोंदणीस स्थगिती दिली.

त्यानंतर दिनांक 22/05/2025 रोजी सातारा बस स्टँड समोरील सर्कल कार्यालयासमोर मंडलाधिकारी अजित घाडगे यांची भेट झाली असता त्यांनी मला मी तुमच्या आक्षेपांवरून सदरचा फेरफार रद्द केला आहे. त्या कामाचे व सातबारा सदरी वरील उर्वरित 47 गुंठेची नोंद तुमच्या बाजूने घेतो असे दोन्ही कामाचे मिळून मला एक लाख रुपये दया असे म्हणाले त्यानंतर तुम्ही आता तुमचा खरेदी दस्त, चालू सातबारा इ. कागदपत्रे व नोंद धरणेबाबतचा अर्ज तलाठी कार्यालय, खिंडवाडी यांचे कार्यालयामध्ये जमा करा. सदर 47 गुंठ्याची नोंद करायची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त मला पैसे पोहोच करा, तलाठी कार्यालयातील नोंद व सदर नोंदीवरून फेरफार उतारा चौकशी करून सातबारा सदरी तुमचे नाव लावण्याची जबाबदारी माझी असे म्हणत मंडलाधिकारी घाडगे यांनी माझ्याकडे एक लाख रुपयाची मागणी केली. मंडलाधिकारी घाडगे यांनी माझे आक्षेपाचा विचार करून पूर्वी झालेला 10 गुंठे खरेदीचा फेरफार रद्द करून निर्णय माझ्याबाजूने दिला असल्याने ते माझे सदरील 47 गुंठे नोंदीचे काम तलाठी कार्यालयात सांगून व नोंद कायम करून सातबारा उतारावरती आमचे नावाची नोंद करतील अशी खात्री वाटल्याने मी त्यास होकार दिला.

सदर दस्ताची नोंद घेण्याची सुरवात तलाठी यांचेकडे अर्ज व दस्ताची छायांकित प्रत देवून होते ते मला माहीत असल्यामुळे तसेच मंडलाधिकारी, घाडगे यांनी तलाठी खिंडवाडी यांचेकडे दस्त नोंदणीसाठी अर्ज देण्यास सांगितल्याने मी दि.26/05/2025 रोजी तलाठी कार्यालय, खिंडवाडी येथे जावून तलाठी बर्गे यांचेकडे खरेदीपत्राची नोंद करून मिळणेबाबतचा अर्ज दिला.

मी आज दि.03/06/2025 रोजी तलाठी कार्यालय, खिंडवाडी येथे जावून तलाठी बर्गे तसेच मंडलाधिकारी, घाडगे यांची भेट घेवून माझ्या कामाच्या अनुषंगाने चर्चा करून मागणी होणाऱ्या लाच रक्कमेबाबत चर्चा करणार आहे.

मंडलाधिकारी, घाडगे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्याची मला अजिबात इच्छा नाही तरी त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी. त्यानंतर टाईप केलेली माझी तक्रार पोउअपधीक्षक वाघमारे साहेव यांना दिली असता त्यांनी व पंचांनी ती वाचून बघितीली व त्यावर सह्या केल्या. पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी माझ्या कामाची सुरुवात ही तलाठी वर्ग यांचेकडून होणार असल्याने प्रथम तलाठी बर्गे यांचेकडे पडताळणी कामी पाठविण्याचा पंचांसमक्ष निर्णय घेतला.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 15.19वाचे सुमारास मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर यांचेसोबत माझेकडील मोटार सायकल क्रमांक एमएच -14- बीई 6972 वरून अँटी करप्शन ब्यूरो सातारा कार्यालय येथून खिंडवाडी ता.जि. सातारा येथे तलाठी कार्यालयामध्ये तलाठी बर्गे यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी त्यांचे ए.सी.बी. कार्यालयात थांबून राहिले.

मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर असे खिंडवाडी ता. जि. सातारा येथील तलाठी येथे गेलो असता तलाठी बर्गे हे कार्यालयात हजर नसल्यामुळे मी माझे मोबाईल क्रमांक 9850899527 वरून स्पीकर ऑन करून तलाठी बर्गे यांचा मोबाईल क्रमांक 9730628532 वर 15.28 वाचे दरम्यान संपर्क करून खिंडवाडी तलाठी कार्यालयात आलो असल्याचे सांगितले तेव्हा त्यांनी मी सकाळी आलो होतो, आता

सर्कल ऑफिस, एसटी स्टँण्ड समोर असल्याचे सांगितले. त्यामुळे मी व पंच नं. 1 असे माझे मोटार सायकलवरून सर्कल ऑफिस, सातारा एसटी स्टँण्ड समोर आलो. तेव्हा माझी तलाठी बर्गे यांची भेट झाली. तेव्हा मी त्यांचेशी माझ्या नोंदीच्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा मी तलाठी बर्गे यांना खरेदी पत्रात आहेत, तेवढं सातबारा नाहीत असे म्हणालो असता तलाठी बर्गे यांनी, त्यामुळे आपल्याला त्याची नोंद घेता येणार नाही असे मला सांगितले. तेव्हा मी त्यांना तुम्ही घाडगे सरांशी बोलाल हा विषय, दाखवून काम आपण दोघ संघच चर्चा करायची, तुम्हाला कस योग्य वाटतय सांगा असे म्हणालो असता तलाठी बर्गे हे, तुम्ही बोला की असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेशी कामाबाबत चर्चा करून मी व पंच नं 1 यांचे सह ए.सी.बी. कार्यालय सातारा येथे 16.14 वाचे सुमारास परत आलो.

तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरून पोहवा गोगावले यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व पंचांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली. त्यामध्ये तलाठी बर्गे यांनी नोंदीचे काम होणार नसल्याचे सांगून लाचेची मागणी न केल्याने कारवाई स्थगित करून व मंडलाधिकारी घाडगे यांचेकडे पुढील पडताळणी कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मंडलाधिकारी श्री घाडगे यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरवून मला व पंचांना पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगून आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 17.20 वा चे सुमारास मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर यांचेसोबत माझेकडील मोटार सायकलवरून एसबी कार्यालय येवून येथुन सर्कल ऑफिस, एसटी स्टँण्ड, समोर सातारा येथे त्यांची भेट घेण्याकरिता रवाना केले त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी ए.सी.बी. कार्यालयात थांबून राहिले. मी व पंच नं. 1 बोळाईकर असे माझे मोटार सायकलवरून एसटी स्टँण्डचे समोर सर्कल कार्यालयाचे बाहेर मोटार सायकल थांबवून कार्यालयात गेलो असता तेथे मंडलाधिकारी घाडगे हे हजर नसल्याने त्यांना माझे मोबाईल क्रमांक 9850899527 वरून स्पीकर चालू करून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईल क्रमांक 7887711062 वर संपर्क केला असता त्यांनी एसटी स्टँडचे पाठीमागे स्टेट बँकेजवळ येण्यास सांगितले. तेव्हा मी पंचासोबत जावून त्यांची भेट घेतली असता त्यांचेशी माझ्या नोंदीच्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा ते मला तुम्ही तो पेमेंटचा विषय केला की नाय पुढे हे होईलना पेमेंटचा विषय केला की नाय पुढे पण आपल किती दिवस झाल मांडलय असे म्हणाले असता मी त्यांना नाय मी तुम्हाला सांगितल की नाय म्हणतो तिकडून सिग्नल येत नाय तोपर्यंत मी तरी काय करणार माझा रोल सांगतो तुम्हांला माझा काय माझ्याकडून काय काम आहे असे म्हणालो तेव्हा मंडलाधिकारी घाडगे हे मला, पेमेंट न करता कस होणार, अस नाय का? असे म्हणाले. त्यानंतर चर्चेत मंडलाधिकारी घाडगे मला, असा विषय आहे, त्यो आम्हांला अस म्हणत्त नाय, कायदयात अजून तरतूद नाय, एकाद्याचा निकाल चुकीचा दिला तर म्हणून त्याला शिक्षा करावी, म्हणून असा विषय आहे. कसं असतंय उद्याला बघतो मी नोंदीच असे म्हणालेने मी पंचासोबत एसीबी कार्यालयात 19.11 वा चे सुमारास परत आलो. मंडलाधिकारी घाडगे यांनी दिनांक 04/06/2025 रोजी नोंदीचे काम करणार असल्याचे सांगितलेने पडताळणी कारवाई स्थागित करण्यात आली.

त्यानंतर पोउअपधीक्षक वाघमारे यांनी दिले सुचनेप्रमाणे मी दिनांक 04/06/2025 रोजी सकाळी 10.00वाजता एसीबी कार्यालयात हजर झालो. पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिति दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथून 12.14 वा चे सुमारास मी व पंच नंबर 1 सोमनाथ बोळाईकर यांचेसोबत माझेकडील मोटार सायकल वरून एसबी कार्यालय सातारा येथून सर्कल ऑफिस सातारा येथे रवाना झालो. सर्कल ऑफिस, सातारा येथे गेल्यानंतर मी माझ्या मोबाईल फोनवरून त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता, त्यांनी ते काय झालं, जरा थोडसं बाहेर आलोय मी, करतो मी फोन असे मला म्हणाल्याने मी पंचासह पुन्हा एसीबी कार्यालयात 12.36 वाचे सुमारास परत आलो. मंडलाधिकारी घाडगे यांची भेट न झाल्याने व त्यांनी फोन करणार असल्याचे सांगितल्याने आम्ही एसीबी कार्यालयामध्ये थांबून राहिलो. त्यानंतर मंडलाधिकारी घाडगे यांचा फोन न आल्याने पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी पंचांच्या सहमतीने मंडलाधिकारी घाडगे यांना संपर्क करण्याचे ठरवून व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून 17.52 वाचे सुमारास मी माझे मोबाईल वरून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईलवर स्पीकर चालू करून संपर्क केला असता, त्यांनी तासभर लागतोय मला, हाय का तुम्ही का जाणार आहे, असे विचारले असता मी त्यांना आले की फोन करा, कुठंशी यायचे ते सांगा असे म्हणालो. त्यानंतर आम्ही एसीबी कार्यालयामध्ये थांबून राहिलो.

त्यानंतर 19.17 वाचे सुमारास मंडलाधिकारी घाडगे यांचा मला फोन आला असता लागलीच पोउअपधीक्षक वाघमारे साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला. तेव्हा मंडलाधिकारी, घाडगे यांनी मला सर्किट हाऊस सातारा जवळ येणेबाबत निरोप दिला. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टच्या आतील बनियानमध्ये लावून एसीबी कार्यालय येथून 19.20वाचे सुमारास सर्किट हाऊस, सातारा येथे जाणेसाठी पंचासोबत रवाना केले. मी व पंच नं 1 बोळाईकर असे माझे मोटार सायकलवरून जात असताना मंडलाधिकारी घाडगे यांचा फोन आला व त्यांनी मला झेडपी चौक येथील राजपुरोहित दुकानचे शेजारील हरमन चहा येथे येण्यास सांगितले. तेव्हा मी पंचासोबत तेथे गेलो व मंडलाधिकारी घाडगे यांना फोन केला असता, ते माझ्या जवळ आले हरमन चहा दुकानचे समोरील फुटपाथवर मी व मंडलाधिकारी घाडगे यांनी माझ्या कामासंबंधी चर्चा केली. तेव्हा मी त्यांना मी माझे नोंदीचे काम घ्या की करून मग म्हटले, काय सत्तेचाळीस तर सत्तेचाळीस गुंठे, बाकीच तेरा गुंठे ते, तीन गुंठे आणि ते दहा गुंठे, अस तेरा गुंठे म्हणले. फेरफार वगैरे काढून त्याच्यावर अपील करून किंवा वकिल देवुन पुढे लढुया पण हे तरी कमीत कमी झाल पाहीजे" असे म्हणालो असता मंडलाधिकारी घाडगे" करुया की" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "त्याच म्हणण कस हाय कि परफेक्ट किती द्यायचे किती कमी करत्याती ते विचारा म्हटले आता त्यांच्याकडं. पण अव्हेलेबल नाहीती पण काल कायतरी पाहुण्यासनी वगैरे फोन करून ऍडजेस्टमेंट केलीया मग दुपारी तुम्हाला म्हटलं फोन केला दुपारी त्यासाठीच तुम्हाला बोलु अगर नको असे म्हणाले." तेव्हा मंडलाधिकारी घाडगें" तुम्हाला सांगु का पेमेन्ट आधी द्याव लागेल पेमेन्ट दिल्याशिवाय हात लावणार नाय ती पेमेन्ट आणलय का? पेमेन्ट पहिल घेवुन या" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "बरं बरं. बरं. ढाणेंच म्हणणं किती द्यायच, आणि किती कमी करत्याती ते विचरा" असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी घाडगे यांनी चर्चा

करून "काय करा, आता तुम्ही काम करा, त्यांच्याकडून एवढे घेतले, तुम्ही काय करा पंच्चाहत्तर करा" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "बर.बर." असे म्हणालो तेव्हा मंडलाधिकारी घाडगें तुम्हाला सात बारा मिळाला की राहीलेले पंचवीस द्या" असे म्हणाले त्यावर मी "ठिक हाय चालतय" असे म्हणालो. तेव्हा मंडलाधिकारी घाडगे हे "तुम्हाला बी वाटणार की बाबा बदली झाली किंवा काय" असे म्हणाले त्यानंतर मी व मंडलाधिकारी घाडगे यांचेत कामाबाबत चर्चा केली. तेव्हा मंडलाधिकारी घाडगें धरली ना एकदा की परत विषय मिटला, तो कार्यकर्ता कसा हाय दिल्याशिवाय धरणार नाय तुम्हाला सांगतो. "असे म्हणाले. त्यावर मी "बर्गे आण्णा व्हयं" असे म्हणाले. त्यावर मंडलाधिकारी घाडगे "हम्म शंभर टक्के धरणार नाय.." असे म्हणाले. त्यावेळी माझेत व मंडलाधिकारी घाडगेयांचेत तक्रारदार यांची तक्रार केलेली नोंद करणेच्या कामाबाबत चर्चा केली. त्यावेळी त्यांनी मला, उद्या किती वाजता भेटणार सांगा मला असे विचारले असता मी काय नाय, मी आता फोन करतो त्यांना, येतो म्हणले गाडी करुन सकाळी तुम्हाला फोन करुन सांगेन असे म्हणालो असता मंडलाधिकारी घाडगे यांनी, अकरा च्या आत या असे सांगितले. त्यानंतर मी पंच नं 1 यांचे सोबत एसीबी कार्यालय सातारा येथे 19.42 वाचे सुमारास परत आलो व पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांना घडलेली हकीकत सांगितली. व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून मंडलाधिकारी घाडगे यांनी माझे नोंदीचे काम करण्यासाठी माझ्याकडे एक लाख रुपये लाचेची मागणी करून उद्या दिनांक 05/06/2025 रोजी सकाळी 11.00 वाजणेच्या पुर्वी 75,000/- रकम घेवून बोलाविले असल्याचे व 25,000/- रु नोंद झाल्यानंतर देण्यास सांगितल्याची खात्री झालेने दिनांक 05/06/2025 सापळा कारवाई करण्याचे पंचांचे सहमतीने ठरवून मला घरी जाण्यास सांगितले,

आज दिनांक 05/06/2025 रोजी 08.30 वा चे सुमारास मी पंचासह एसीबी कार्यालयामध्ये हजर असताना पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना सापळा पूर्व व सापळा कारवाईची माहिती थोडक्यात सांगून प्रक्रिया समजावून सांगितली, तसेच सापळा पथकातील पोहवा ताटे, पोहवा गोगावले, पोहवा राजपूरे यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 75,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणून पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी दिले सुचनेवरून सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचांना समजावून सांगितले. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व त्यांच्या सहकायांनी पंचासमक्ष सापळापूर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सूचनेवरून पोहवा ताटे यांनी अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ही माझे पँन्टच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात ठेवून दिली व मंडलाधिकारी घाडगे यांना लाच रक्कम दिल्या नंतर डोक्यावरील टोपी काढण्याचा इशारा करण्याच्या सूचना पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला दिल्या.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून मंडलाधिकारी घाडगे यांची कोणत्या ठिकाणी भेट घेण्यासाठी जायचे आहे याची माहिती घेणेसाठी माझ्या मोबाईल फोनवरून फोन करण्यास सांगितला व सदरचा फोन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करणार असल्याचे सांगून व्हॉईस रेकॉर्डर चालू केल्यानंतर माझे मोबाईल फोनवरून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईलवर स्पीकर चालू करून 09.56वाचे सुमारास संपर्क केला असता त्यांनी पोवई नाका, सातारा येथे येण्यास सांगितले. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बनियानमध्ये लावून मला पंच नं 1 यांचे सोबत माझे मोटार सायकलवरून पोवई नाका येथे 10.21 वाचे सुमारास रवाना केले. आमचे पाठोपाठ पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेव व सापळा पथक व पंच नंबर 2 हे त्यांचे शासकीय वाहनातून आले. मी पोवई नाका सातारा येथे आल्यानंतर माझे मोबाईलवरून स्पीकर चालू करून मंडलाधिकारी घाडगे यांचे मोबाईल वरती 10.22 वा चे सुमारास संपर्क केला असता त्यांनी मला स्टेट बँकेजवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नं 1 असे एसटी स्टैंडचे पाठीमागील स्टेट बँक जवळ येवून थांबलो. आमचे पाठोपाठ पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब व सापळा पथक आमचे पाठोपाठ येवून स्टेट बँक व पारंगे चौकामध्ये सापळा लावून थांबले. काही वेळानंतर मंडलाधिकारी घाडगे यांची वाट पाहून मी त्यांना पुन्हा कॉल केला असता ते स्टेट बँकेसमोर आले व मला कॉर्नरला चहा घेवू असे म्हणाले, तेव्हा मी पुढे व पंच मागे असे चालत कॉर्नरच्या चहाचे टपरीवर गेलो. तेथे मंडलाधिकारी घाडगे आले. त्यांचेशी मी माझ्या कामाबाबत चर्चा करून मंडलाधिकारी घाडगे यांना नोंद घालण महत्वाच आहे. पंच्याहत्तर हजार रुपये दिल ढाण्यांनी काल, सकाळी आणून, मी म्हणल मग मी काय मग बर्गे साहेबांच्याकड काय जात नाही. आपल्या स्तरावरच करून घ्या असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी घाडगे हे, नको जायला, त्यो नाहीच म्हणत होता, त्याला मी आता मी सिनीयर आहे. त्याला मी समजून सांगीतल मग म्हणला मी घेऊन येतो इथं, आज येणार आहे तो माझ्याकडे मी बोलावलाय. अशा पद्धतीन अशी नोंद घालायची तू चुकीची घालू नकोस तुला अस म्हणत नाय की दस्त साठ गुंठ्यांचा हाय न मग आपण त्याचा न उल्लेख करता डायरेक्ट सत्तेचाळीस गुंठ्याचा अस नाय. तो बी उल्लेख करायचा. माग पुढे समजा परत कोर्टात तुम्ही गेला असे म्हणाले. त्यावर मंडलाधिकारी घाडगे यांनी, आज रोजी ज्याच्या नावावर सत्तेचाळीस आहे म्हणून सत्तेचाळीस देतोय असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना, सत्तेचाळीस देताय वर बर असे म्हणालो असता मंडलाधिकारी हे, आस, त्याजा फेरफार व्यवस्थित घालून देतो, त्याजी काळजी करू नका असे म्हणाले. त्यावर मी त्यांना, ढाणे म्हणले फोन करा लगेच राहीलेले पंचवीस पण देऊन टाकू लागलीच, म्हणले कवातरी द्यायचच आहे असे म्हणालो त्यावर मंडलाधिकारी घाडगे हे नाय काय अडचण तुम्ही वेळ केला लय पण म्हंजी कशासाठी वेळ केला. मी असताना का नाय भल तुमी म्हणला असता का नाय साहेब माझ्यावर विश्वास ठेवा तेवढ मला करून द्या, पण आता बदल्या हायत्या, ते दुसऱ्याला बिनकामाच मला म्हंजी एक मदत घ्यायला लागती ना स्वतःच्या हातान आणि दुसऱ्याला हे करण म्हंजी तुम्ही नुसत मला म्हणला असता का नाय माझा शब्द हाय असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांचेशी कामाबाबत चर्चा करून हे पंच्याहत्तर हजार हायती मोजून घेताय? असे म्हणालो. तेव्हा मंडलाधिकारी घाडगे हे मी कधीच मोजून घेत नाय, कुणाचेच घेत नाय, मला कमीच कधी येत नाय, या गाडीत या असे म्हणाले. त्यावेळी मी च मंडलाधिकारी घाडगे हे त्यांच्या गाडीमध्ये बसलो असता मी माझ्या कडील पँन्टच्या उजव्या खिशातील अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून मंडलाधिकारी घाडगे यांचे पूढे धरली असता त्यांनी तो लाख रक्कम त्यांच्या डाव्या हात्राने घेवून शर्टच्या घरील डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी गाडीबाहेर येवून माझ्या डोक्यावरील टोपी काढून सापळा पथकास दिसेल असा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा सापळा पथकातील पोहवा ताटे, पोहवागोगावले यांनी मंडलाधिकारी घाडगे यांना गाडीतून बाहेर घेवून अनुक्रमे उजवा हात व डावा हात पकडला.

पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरून पोहवा राजपूरे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. ती वेळ 10.57 वा चे सुमाराची होती. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मंडलाधिकारी घाडगे यांना त्यांची ओळख सांगून त्यांना अँथ्रासिन पावडर लावलेल्या लाच रक्कमेसह ताब्यात घेतले, त्यावेळी पोलीस उपधीक्षक वाघमारे यांचे सुचनेवरून पंच नंबर 2 यांनी मंडलाधिकारी घाडगे यांचे शर्टच्या खिशातील लाच रक्कम काढून स्वतःचे ताब्यात घेतली. ती वेळ 11.00 वा. ची होती.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी त्यांचे शासकीय वाहनामध्ये बसवून सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. तसेच अँन्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व आमच्या हातांची अँल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई एसीबी कार्यालय, सातारा येथे जावून करण्याचे निश्चित केले.

तरी मी खिंडवाडी ता.जि. सातारा येथील गट नंबर 17/1/1 या शेत जमीनीच्या झालेल्या दस्तांमधील लिहून घेणारे यांचे वतीने कुलमुखत्यावर असून सदरचा दस्त हा 60 गुंठे असून मुळ मालक यांनी दस्तामधील लिहून घेणार यांची नावे सातबारा सदरी न लागल्याचा फायदा घेवून पूर्वीच विक्री केलेल्या 60 गुंठयापैकी 13 गुंठे जमीन ही पुन्हा विक्री केली आहे. तदनंतर 2024 मध्ये मुळ मालक यांनी पुन्हा उर्वरित 47 गुंठ्यापैकि 10 गुंठे जमीन ही विक्री केली होती. सदर दस्तावरून तलाठी खिंडवाडी यांनी सदर 10 गुंठे जमीनीची नोंद सातबारा सदरी धरली. त्यामुळे मी कुलमुख्यत्यार या नात्याने मंडलाधिकारी कोडोली यांचेकडे सदर नोंदीवर आक्षेप नोंदविला. त्यावर मंडलाधिकारी घाडगे यांनी आक्षेपावरील सुनावणीअंती माझा आक्षेप मान्य केल्याचा निर्णय देवून सदरील 10 गुंठे जमीनीच्या नोंदीबाबतचे फेरफारास स्थगिती दिली. दिनांक 04/06/2025 रोजीच्या पडताळणी कारवाई वेळी मंडलाधिकारी घाडगे यांनी फेरफार रद्द केल्याच्या कामाचे व तलाठी बर्गे यांचेकडून उर्वरित 47 गुंठे नोंदीचे काम करून देतो म्हणून माझ्याकडे एकूण एक लाख रुपये लाचेची मागणी करून दिनांक 05/06/2025 रोजी सापळा कारवाई वेळी अजित दादासाहेब घाडगे वय-48 वर्ष, मंडलाधिकारी खंड अतिरिक्त कार्यभार कोडोली, महसुल खाते, वर्ग-3 यांनी माझ्याकडून 75,000/- रु लाच रक्कम पारंगे चौक, सातारा येथील राजेंद्र टी हाऊस समोर स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

पो.स्टे.ऑफिसर
शाहुपुरी पोलिस स्टेशन सातारा

हा खबरी जबाब दिला.